| MHSO110046662015 | दाखल तारीख | १७/१२/२०१५ | | |
|---|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | १८/१२/२०१५ | | |
| | निकाल तारीख | २५/०६/२०२६ | | |
| | कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | | १० | ०६ | ०८ |

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माळशिरस यांचे न्यायालयात
(पिठासीन अधिकारी आदित्य अ.व्यास)

**नियमित दिवाणी दावा क्र. १६४८/२०१५**
**निशाणी क्रमांक – २३.**

**श्री. दिपक लक्ष्मण पताळे,**
वय – ४६ वर्षे, धंदा – शेती,
रा. तोंडले, ता. माळशिरस, जि. सोलापुर. ... **वादी**

**विरुध्द**

१. **श्री. तेजस दिपक पताळे,**
वय – २१ वर्षे, धंदा – शेती,

२. **श्री. रोहित दिपक पताळे,**
वय – १९ वर्षे, धंदा – शेती,

३. **सौ. पुष्पा दिपक पताळे,**
वय – ४० वर्षे, धंदा – शेती,
सर्व रा. सराफवाडी, ता. इंदापुर, जि. पुणे ... **प्रतिवादी**

.... दावा जाहीर ठराव होवुन मिळणेकरीता

| | |
|---|---|
| वादीतर्फे विधीज्ञ | : श्री. आर. बी. मुलाणी. |
| प्रतिवादी तर्फे विधीज्ञ | : श्री. एस. बी. पाटील. |

## न्यायनिर्णय

### (दिनांक २५/०६/२०२६ रोजी जाहीर)

वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादींविरुध्द रे.मु.नं.२७४/१९९७ मध्ये झालेल्या हुकूमनाम्याच्या अनुसरुन प्रतिवादींना त्यांचा हिस्सा देण्यात यावा व रे.द.क्रं. २०६/२००७ ची दरखास्तीचे कामी झालेले अंमलबजावणीचे कामकाज बेकायदेशीर असलेचे जाहीर करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणेः**

२. मौजे तोंडले, ता. माळशिरस, जि. सोलापुर येथील गट क्रं. ३६३/१ व ३६३/२ यांचे क्षेत्र अनुक्रमे १.८८ पोटखराब ०.०१ व ३.१३ पोटखराब ०.०२ हे.आर यास आकारणी अनुक्रमे रक्कम रुपये पैसे २.१६ व ३.५९. या जमिनी दाव्याचा विषय असुन सदर दावा मिळकतींस यापुढे संक्षेपाकरीता 'दावा मिळकती' असे संबोधणेत आले आहे.

**वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः**

३. दावा मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या वडीलार्जीत मिळकती असुन प्रतिवादींनी मे. कोर्टात रे.मु.नं.२७४/१९९७ हा सरस निरस मानाने वाटप व पृथक कब्जा मिळणेकरीता दाखल केलेला होता. सदर दाव्याचा निकाल दिनांक

०३/०६/२००७ रोजी होवुन त्याची अंमलबजावणीकामी प्रतिवादींनी मे.कोर्टात रे.द.क्रं. २०६/२००७ दरखास्त दाखल केली होती. सदर दरखास्त दिनांक ३०/१०/२००७ रोजी निकाली होवुन रे.मु.नं. २७४/१९९७ प्रमाणे वाटप करणेकामी मा. कलेक्टरसाो सोलापुर यांना आदेश होवुन मा. तहसिलदारसाो माळशिरस यांचेकडे पुढील वाटपाच्या कार्यवाहीसाठी पाठविणेत आली. त्यानुसार मा. तहसिलदारसाो, मा. मंडल अधिकारीसाो, मा. गावकामगार तलाठी यांनी प्रत्यक्ष दावा मिळकतीत येवुन पंचनामा, कब्जेपावती करुन मा. तालुका अधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडुन वाटप तक्ता तयार करुन वाटप झालेली आहे. त्यास मे. कोर्टाच्या हुकूमनाम्यास बाधा आलेली आहे. रे.मु.नं. २७४/१९९७ च्या हुकुमनाम्याप्रमाणे प्रतिवादींना प्रत्येकी १/८ हिस्सा म्हणजेच प्रत्येकी ०.६२.६२५ आर इतके क्षेत्र येत आहेत. मात्र गावहक्कपत्रकीच्या ७/१२ नोंदी पाहिल्या असता दावा मिळकत गट क्रं. ३६३/१ मध्ये प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या नावाची नोंद संपुर्ण गटास झालेली असुन गट क्रं. ३६३/२ ला प्रतिवादी क्रं. ३ हिच्या नावाची नोंद झालेली आहे. त्यामुळे वादीचा संपुर्ण १/८ हिस्सा प्रतिवादींना गेलेला आहे. वास्तवात रे.मु.नं. २७४/१९९७ मधील हुकूमनाम्याची अंमलबाजवणी होणे आवश्यक होते. त्याबाबत वादीने उपविभागीय अधिकारीसाो अकलुज यांचेकडे रितसर महसुल अधिनियम कलम २४७ प्रमाणे अपील केले होते. त्यामध्ये केवळ विलंब माफीचा अर्जावर हुकूम करुन दुरुस्ती करण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द रे.मु.नं.२७४/१९९७ मध्ये झालेल्या हुकूमनाम्याच्या अनुसरुन प्रतिवादींना हिस्सा देण्यात यावा व रे.द.क्रं. २०६/२००७ ची दरखास्तीचे कामी झालेले अंमलबजावणीचे कामकाज बेकायदेशीर असलेचे जाहीर करुन मिळणेस दाखल केलेला आहे.

**<u>प्रतिवादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः</u>**

**४.** प्रतिवादींनी दाव्याकामी हजर होवुन निशाणी क्रं. १० वर कैफियत दाखल करुन वादीची दाव्यातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादीं कथन करतात की, प्रस्तुत

दावा हा मेंटेनेबल नाही कारण त्यावरुन पुढील काही दाद मागितली नाही. तसेच वाटप होतेवेळी क्षेत्र बरोबरीनेच येईल असे नाही. वादीने केलेल्या सर्व तक्रारी रे.द.क्रं. २०६/२००७ मध्ये करता आल्या असत्या असा स्वतंत्र दावा मेटेनेबल नाही. वादीने दाव्यात केलेली मागणी चुकीची असुन दावा रद्द होणेस पात्र आहे.

५. वादीतर्फे विधिज्ञ श्री. आर. बी. मुलाणी यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे विधिज्ञांनी युक्तीवाद केला नाही. दाव्याचे व कागदपत्रांचे अवलोकन केले, मी निशाणी क्रं. १२ वर मुद्दे नोंदविले असून त्यांची कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नोंदवत आहे.

| अ.नं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांनी वादी विरुध्द रे.मु.नं. २७४/१९९७ दाखल केला होता व त्याची दरखास्त रे.द.क्रं. २०६/२००७ दाखल होती हे वादी सिध्द करतो का? | **होय.** |
| २ | वादीचे क्षेत्र हुकुमनामेप्रमाणे त्याचे नावे न आल्याचे वादी सिद्ध करतो का? | **नाही.** |
| ३ | रे.मु.नं. २७४/१९९७ प्रमाणे प्रतिवादी यांना त्यांचा हिस्सा देण्यात यावा व रे.द.क्रं. २०६/२००७ चे दरखास्तीचे काम बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवुन मिळणेस वादी पात्र आहे का? | **नाही.** |
| ४ | अंतिम आदेश व हुकूम काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

६. **वादी पुरावाः–**

वादीने त्याच्या कथनाच्या पुष्टयर्थ खालील नमुद साक्षीदार तपासले आहेत.

| अ.क्रं. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचे स्वरुप | निशाणी क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | दिपक लक्ष्मण पताळे | वादी स्वतः | १३ |

वादीने तोंडी पुरावा संपल्याची पुरशिस नि.क्र. २२ येथे दाखल केली आहे.

७. वादीने त्याचे तोंडी पुराव्याचे पुष्टयर्थ खालील कागदपत्रांचा आधार घेतला आहे.

| अ.क्रं | कागदपत्राचे वर्णन.. | नि. क्रं. |
|---|---|---|
| १. | रे.मु.नं. २७४/१९९७ चा हुकुमनाम्याची सही शिक्क्याची प्रत | १७ |
| २. | तहसिल कार्यालय माळशिरस येथील आर.टी.एस.क्रं. १०/२००९ चा न्यायनिवाडा याची सही शिक्क्याची प्रत | १८ |
| ३. | मौजे तोंडले येथील वाटप तक्ता याची सही शिक्क्याची प्रत | १९ |
| ४. | मौजे तोंडले येथील पंचनामा सही शिक्याची प्रत | २० |
| ५. | मौजे तोंडले येथील फेरफार क्रं. २२४० ची सही शिक्कयाची प्रत | २१ |

**मुद्दा नं. १ ते ४ बाबतः–**

८. सर्व मुद्दे हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सर्व मुद्दे एकत्रीतरित्या चर्चेसाठी घेण्यात आलेले आहेत.

९. वादी यांनी स्वतःचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रं. १३ कडे दाखल करुन मुळ दावापत्राशी सुसंगत असा मजकुर नमुद केलेला आहे. वादीच्या कथनानुसार प्रतिवादींनी त्यांचेविरुध्द वाटपाकरीता मे. कोर्टात रे.मु.नं. २७४/१९९७ चा दावा दाखल केलेला होता. सदर दावा दिनांक ०३/०६/२००७ रोजी निकाली होवुन त्याची अंमलबजावणीकामी प्रतिवादींनी मे. कोर्टात रे.द.क्रं. २०६/२००७ दाखल केलेला होता.

सदर दरखास्त मा. कलेक्टरसाो सोलापुर यांना वाटप करणेचे आदेशीत होवुन दिनांक ३०/१०/२००७ रोजी निकाली करणेत आले. मा. कलेक्टरसाो सोलापुर यांनी मा. तहसिलदारसाो माळशिरस यांचेकडे वाटपाकरीता प्रकरण पाठविणेत आले. त्यानुसार मा. तहसिलदारसाो, मा. मंडल अधिकारी, मा. गावकामगार तलाठी यांनी प्रत्यक्ष मिळकतीत येवुन पंचनामा व कब्जेपावती व मा. तालुका अधिक्षक भुमि अभिलेख यांचेकडुन वाटप तक्ता करुन त्याप्रमाणे दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यास नोंदी करणेत आलेल्या आहेत.

**१०.** वादीच्या कथनानुसार रे.मु.नं. २७४/१९९७ चे हुकुमनाम्याप्रमाणे वादी व प्रतिवादींना प्रत्येकी १/८ हिस्सा दिलेला आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींना प्रत्येकी १/८ हिश्याप्रमाणे म्हणजेच प्रत्येकी ०.६२.६२५ आर एवढेच क्षेत्र येत आहे. मात्र मा. तहसिलदारसाो माळशिरस यांनी गट क्रं. ३६३/१ हे प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या नावे व गट क्रं. ३६३/२ प्रतिवादी क्रं. १ ते ३ यांच्या नावे दिलेला आहे. त्यामध्ये वादीचा हिस्सा हा प्रतिवादींना गेलेला असल्याने दरखास्तीची अंमलबजावणी हुकुमनाम्याला सोडुन झालेली आहे. त्यामुळे दरखास्तीतील अंमलबजावणी बेकायदेशीर असल्याचे जाहीर ठराव होवुन मिळणेकरीता वादीने विनंती केलेली आहे. याउलट प्रतिवादींच्या कथनांनुसार वादीने केलेला प्रस्तुत दावा मेनटेनेबल नसुन वादीने केलेल्या तक्रारी दरखास्तीमध्ये करणे गरजेचे होते. तसे वादीने केलेले नाही त्यामुळे प्रस्तुत दावा रद्द करणेत यावा अशी विनंती केलेली आहे.

**११.** वादीने त्याच्या कथनाच्या पुष्टयर्थ अभिलेखावर रे.मु.नं. २७४/१९९७ चे हुकूमनाम्याची प्रत (निशाणी क्रं. १७) वर दाखल केलेली आहे. तसेच निशाणी क्रं. ४ लगत अ.क्रं. २ वर रे.मु.नं. २७४/१९९७ चे न्यायनिर्णयाची झेरॉक्स प्रत व अ.क्रं. ३ वर रे.द.क्रं. २०६/२००७ ची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, प्रतिवादींनी वादीच्या विरुध्द वाटपाकरीता रे.मु.नं.२७४/१९९७ दाखल केलेला होता. सदर दाव्याच्या निकालाचे अंमलबजावणीकरीता प्रतिवादींनी रे.द.क्रं. २०६/२००७ दाखल केल्याचे दिसुन येते.

१२. तसेच वादीने मा. तहसिलदारसाो माळशिरस, मंडल अधिकारी, गावकामगार तलाठी व उपविभागीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष दावा मिळकतीत जावुन वाटप करुन त्याचा पंचनामा व वाटप तक्ता करुन प्रतिवादींच्या नावांची नोंद झाल्याचे कथन केलेले आहे. सदर कथनांकरीता वादीने तहसिल कार्यालय माळशिरस येथील आर.टी.एस.क्रं.१०/२००९ चे न्यायनिर्णयाची प्रत (निशाणी क्रं. १८), वाटप तक्ता (निशाणी क्रं. १९), पंचनामा (निशाणी क्रं. २०) व फेरफार क्रं. २२४० (निशाणी क्रं. २१) वर दाखल केलेले आहे. सदर कागदपत्रांचे अवलोकन केले असता, रे.मु.नं. २७४/१९९७ व रे.द.क्रं. २०६/२००७ यामधील आदेशान्वये दावा मिळकतीत प्रत्यक्ष जावुन त्याचा पंचनामा करुन वाटप तक्ता तयार करुन फेरफार क्रं. २२४० अन्वये नोंद केलेली आहे. वादीने दाखल केलेले रे.मु.नं. २७४/१९९७ चे हुकुमनाम्यानुसार प्रतिवादींनी मौजे तोंडले येथील गट क्रं. ३६३ याचे क्षेत्र ५.०१ हे.आर पोटखराब ०.०३ हे.आर आकारणी ५.७५ रुपये पैसे व गट क्रं. ३९२/२/१ याचे क्षेत्र २.५३ हे.आर पोटखराब ०.४४ हे.आर यासी आकारणी २.१० रुपये पैसे पैकी ०.०३ हे.आर आकारणी ०.०५ रुपये पैसे यांचे वाटप करुन मागितलेले आहे. वादीने दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार, मा. तहसिलदारसाो यांनी वादी व प्रतिवादींमध्ये वाटप करुन प्रतिवादी क्रं. १ व २ यांना गट क्रं. ३६३ मधील १.८८ हे.आर पोटखराब ०.०१ हे.आर तसेच प्रतिवादी क्रं.३, वादी व वादीचे भाऊ यांना गट क्रं. ३६३ मधील ३.१३ पोटखराब ०.०२ हे.आर क्षेत्र दिलेले आहे. त्यानुसार त्यांना गट क्रं. ३६३/१ व ३६३/२ असे दोन गट पडलेले आहे.

१३. वादीने दाव्यात केलेल्या कथनांनुसार गट क्रं. ३६३/१ मधील १.८८ हे. आर पोटखराब ०.०१ हे.आर क्षेत्रामधुन प्रतिवादींना त्यांच्या १/८ हिश्याप्रमाणे ०.६२.६२५ आर क्षेत्र देणे आवश्यक होते. परंतु प्रतिवांदीनी दोंन्ही गटास त्यांची नावे नोदंविलेली आहेत. वादीने निशाणी क्रं. ४ लगत दाखल केलेल्या गट क्रं. ३६३/१ व ३६३/२ यांच्या ७/१२ उता–याचे अवलोकन केले असता, गट क्रं. ३६३/१ या गटास प्रतिवादी क्रं. १ व २ यांच्या नावांची नोंद असुन गट क्रं. ३६३/२ या गटास प्रतिवादी क्रं.

३, वादी व वादीचे भाऊ यांच्या नावांची नोंद असल्याचे दिसुन येते. यावरुन रे.मु.नं. २७४/१९९७ या दाव्याच्या निकालानुसार व रे.द.क्रं. २०६/२००७ च्या निकालानुसार मा. तहसिलदारसाो यांनी केलेल्या वाटपामध्ये प्रतिवादींचे हिश्याप्रमाणे म्हणजेच १/८ प्रमाणे त्यांना वाटप झालेले असुन वादीस गट क्रं. ३६३/२ मध्ये त्याचे हिश्याप्रमाणे ७/१२ उता–यास नोंद झालेली आहे.

**१४.** वरील कागदपत्रांन्वये प्रतिवादींनी वादी विरुध्द रे.मु.नं. २७४/१९९७ व रे.द.क्रं. २०६/२००७ दाखल केलेले होते हे स्पष्ट होते. तसेच दावा व दरखास्तीमधील आदेशाप्रमाणे हिश्यानुसार वाटप होवुन वादी व प्रतिवादींच्या नावांची नोंद झालेली आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादींविरुध्द केलेली जाहीर ठरावाची मागणी मान्य करता येणार नाही. प्रतिवादी क्रं. १ व २ यांना रे.मु.नं. २७४/१९९७ मधील हुकूमनाम्याप्रमाणे सदर दाव्यातील दोंन्ही गटामधील एकत्रीत प्रत्येकी १/८ हिस्सा हा रे.द.क्रं. २०६/२००७ प्रमाणे मिळाल्याचे दिसते. केवळ वादीच्या मागणीप्रमाणे गट क्रं. ३६३/१ व ३६३/२ मधील हिश्याबाबत मागणी वादीस करता येणार नाही. त्यामुळे मी मुद्दा क्रं. १ हे होकारार्थी व मुद्दा क्रं. २ व ३ हे नकारार्थी नोंदवित आहे.

**१५.** वादीने त्याची केस तोंडी व कागदोपत्री पुराव्यांवरुन शाबीत केली नसल्यामुळे वादीचा दावा मंजूर होण्यास पात्र नाही. सर्वसाधारणपणे दिवाणी प्रकरणामध्ये जो पक्षकार आपली बाजु सिध्द करु शकत नसेल तर त्याला दाव्याचा खर्च दिला जात नाही. या प्रकरणामध्ये वादीने आपली बाजु सिध्द केलेली नाही. त्यामुळे वादी दाव्याचा खर्च मिळणेस पात्र नाही. सबब मुद्दा क्र.४ चे उत्तरादाखल खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. दावा खर्चासह नामंजूर करण्यात येतो.

२. येणेप्रमाणे हुकूमनामा करण्यात यावा.

Digitally signed by AADITYA AVINASH VYAS
Date: 2026.06.25 16:33:20 +0530

दिनांक–२५/०६/२०२६
माळशिरस.

**(आदित्य अ. व्यास)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
माळशिरस.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word as per the original Judgment.

(a) Name of the Stenographer : S.T.Korbu

(b) Name of the Court : 2nd Jt. C.J.J.D & J.M.F.C Malshiras, Dist - Solapur

(c) Order signed by P.O. On : 25-06-2026.

(d) Order uploaded on : 25-06-2026.